UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक १०

G20
भारत 2023 INDIA

स्थापना : ९ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक १० – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : १०

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे • प्रा. ऋषिकेश काळे • प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान**

- डॉ. रविकांत शिंदे ---------- ७

२. **आशा बगे यांच्या कथेतून व्यक्त झालेल्या सांगीतिक प्रतिमांचे विश्वशांती आणि विकासासाठी योगदान**

- प्रा. प्रियांका अशोक कुंभार ---------- ११

३. **जागतिक शांततेत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान व भूमिका**

- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे ---------- १५

४. **डॉ. प्रकाश पर्येंकार हांच्या कथेंतल्यान अभिव्यक्त जावपी मानवी मुल्यां, उदरगत आनी शांतताय**

- सानिका गांवकार ---------- १९

५. **जागतिक प्रगती आणि स्त्रीवादी चळवळ**

- डॉ.गजानन लोंढे ---------- २२

६. **नीरजा यांच्या कथेतील 'पावसात सूर्य शोधणारी माणसं'मधील शांती व प्रगतीच्या शोधात असलेली सक्षम स्त्री**

- चैताली चिदानंद कोळी, डॉ. सुनीता उम्रस्कर ---------- २६

७. **संत साहित्यात्यील चिरंतन मूल्ये आणि वैश्विक शांतता**

- डॉ.सचिन माधवराव कोतकर ---------- २९

८. **जागतिक शांतता व प्रगतीसाठी संतांचे योगदान**

- डॉ. उज्वला यशवंत सामंत ---------- ३२

९. **जागतिक शांततेसाठी व प्रगतीसाठी संस्कृतीचे योगदान**

- प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम ---------- ३६

१०. **जागतिक शांतता व प्रगतीसाठी संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या पसायदानाचे योगदान**

- डॉ.रेश्मा रमेश दिवेकर ---------- ३९

११. **जागतिक शांतता, प्रगती आणि आजचा वर्तमानकाळ**

- प्रा.गणेश जा.मस्के ---------- ४३

ISSN No. 2394-5990

# संत साहित्यात्यील चिरंतन मूल्ये आणि वैश्विक शांतता

**डॉ.सचिन माधवराव कोतकर**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर
मोबाईल -९४२३४२८४१७
ईमेल-sachinkotkarnet@gmail.com

महाराष्ट्रभूमी ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. आपल्या अभंग ओव्यांच्या माध्यमातून त्यांनी सर्व सामान्यांच्या मनावर खोलवर संस्कार केले. आध्यात्मिक पूजा बांधत असताना दांभिकता आणि ढोंगीपणावर कडाडून प्रहार केला. आपल्या जीवित कार्यातून संतांनी समता, ममता, बंधुभाव रुजविला. संतांचे कार्य म्हणजे दीपस्तंभा प्रमाणे आहे. ते सर्व सामान्यांना अंधकारातून बाहेर काढून ज्ञानज्योतीच्या प्रकाशात नेत असतात. ह्अगोदर कृती केली मग इतरांना सांगितलीफएक प्रकारे संतांच्या कार्याचे स्वरूप हे कृतीप्रवण असल्याचे दिसून येते. संत साहित्याचा आपण जेंव्हा विचार करतो तेंव्हा आपल्याला मध्ययुगीन कालखंडाचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. मध्ययुगीन संत साहित्याचा ठसा आपल्या मनावर अजरामर असा उमटलेला आहे. हा ठसा विशिष्ट समुदायावरच उमटलेला नसून संपूर्ण विश्वातील जनमानसावर उमटलेला दिसतो. संत साहित्याला विशिष्टत्वाची परिसीमा दिसून येत नाही. विश्वातील सर्व चराचरात परमेश्वरत्व शोधणाऱ्या संतांना परिसीमा कोठून असणार. वारकरी संप्रदयाच्या तत्वज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट जरी आध्यात्मिक असले तरी वारकरी संप्रदाय लौकिक जीवन नाकारताना दिसत नाही. वारकरी संप्रदाय लोकाभिमुख असल्यानेच समाजातील सर्व स्तरातील घटकांचा त्यांनी पारमार्थिक आणि लौकिक विकास केलेला दिसतो.

**उदात्त जीवनादर्श :**

उदात्त जीवनादर्श समाजातून संपुष्टात आले तर मानवी जीवन आणि संस्कृतीचा अस्त होईल. याची जाणीव संतांना असल्याची साक्ष संत साहित्यातून मिळते. आपले उदात्त आणि सुसंस्कारी विचार अभंग आणि ओव्यांच्या माध्यमातून मांडलेले दिसतात. आणि सर्वसामान्यांच्या हृदयातील दीपक तेवत ठेवलेला दिसतो. अन्यथा हा दीपक विझला असता तर पाश्चात्य देशातील संस्कृतीत जी पोकळी दिसते ती आपल्याही संस्कृतीत दिसली असती. उदात्त असे जीवनादर्शाचे धडे आजच्या युवा पिढीला देणे आवश्यक आहे. त्यासाठी संतसाहित्याचा समावेश शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात असणे आवश्यक आहे. आणि या संत साहित्यातील उदात्त अशा मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांच्या मनात करणे हे आधुनिक शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविली गेली नाही तर भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात. संतसाहित्यातील चिरंतन मूल्यांतून सुदृढ समाज निर्माण होऊ शकतो. याची जाणीव आपण सर्वांनी ठेवणे गरजेचे आहे.

**जीवनमूल्ये :**

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव संत तुकाराम आदी संतांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सर्वसामान्य व्यक्तिमत्त्वाचे रुपांतर आदर्श व्यक्तिमत्त्वात कस करता येते याचा वस्तुपाठच जनसामान्यांना दिला. संत ज्ञानेश्वरांना आपण माउली म्हणून संबोधतो या माउलीने ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून निष्काम कर्मयोगाची शिकवण दिली. आपले व्यक्तिमत्त्व कशा पद्धतीने वृद्धिंगत करावे याचा आदर्शच संतांनी स्वत:च्या जीवनातून घालून दिलेला दिसतो. आपल्या मनाची कक्षा विश्वातील प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी कशी रुंदावी हे संतांनी आपल्याला शिकविले. समता, बंधुता, करुणा, दया, अहिंसा, समन्वय याचं मोल मानवी जीवनात किती महत्त्वाचे आहे हे संतांनी आपल्याला शिकविले. ही जीवनमूल्यं मध्ययुगीन काळापुरतीच मर्यादित होती असे आपल्याला म्हणता येणार नाही. संतांनी आचरणात आणलेली ही जीवनमूल्ये आजच्या आधुनिक काळात मानव जातीच्या शाश्वत विकासासाठी आवश्यकच असलेली दिसतात.

सामान्य कुटुंबात जन्मलेल्या संत नामदेवांनी आपल्या भक्तीच्या बळावर केवढी मोठी उंची गाठली. कीर्तनाच्या माध्यमातून वारकरी सांप्रदायाची ध्वजा पंजाब पर्यंत फडकावली. नरसीबामणीत सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या एका असामान्य विठ्ठल भक्ताने कीर्तनातून भक्तीचा जो गजर केला त्याला पंजाबमधूनही उदंड असा प्रतिसाद मिळाला. नामदेवांची ही भक्ती अनुकरणीय अशीच आहे. त्यामुळेच आजही सर्वसामान्यांच्या मुखात संतांची अभंगवाणी दिसून येते. जप,

ISSN No. 2394-5990

तरी ही जीवनमूल्ये आजही जगाला प्रकाशमान करताना दिसतात. ९०च्या दशकानंतर जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले आणि या जागतिकीकरणाच्या रेट्यात संत साहित्य मागे पडेल का? असा प्रश्न काहींच्या मनात देखील आला होता. कारण याच काळात पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण जास्त प्रमाणात होताना दिसत होते. परंतु सोबतच त्यात असलेला फोलपणाही लोकांच्या नजरेत येताना दिसत होता. सात शतके लोटल्यानंतरही आजदेखील ज्ञानेश्वरी, नामदेव गाथा, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत यांचे पारायण गावोगावी होताना दिसते. आजही संतसाहित्यविषयकनिष्ठा जपताना लोक दिसतात. आजच्या सोशल मिडीयाच्या काळात हे संतसाहित्य समाजातील घटकांशी प्रभावीपणे संवाद साधू शकेल का ? या संदर्भात प्रश्न उपस्थित होऊ शकतो. आज आपल्याला अनेक कीर्तनकार, समाज प्रबोधनकार संतवाणीचा आधार घेऊन समाज प्रबोधन/उदबोधन करताना दिसतात. आणि त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहता संतसाहित्य हे कालातीत स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. आजच्या काळात कमालीची भोगवादी वृत्ती, भ्रष्टाचार, चंगळवाद निर्माण झाल्याने समाजात अस्वस्थता पसरलेली आहे. अशा अंधकारमय काळात संतसाहित्यातील मूल्ये समाजाला तारण्यासाठी उपकारक अशी ठरणारी आहेत. ताणतणावाखाली जगणाऱ्या समाजाला मन:शांतिसाठी संतसाहित्यच आधारभूत ठरणारे आहे.

**समारोप :**

संतांची एकूणच विचारधारा आपण पाहिली तर ती समतावादाचा पुरस्कार करणारी असल्याचे दिसून येते. चराचरात परमेश्वर सामावलेला आहे अशी व्यापक भूमिका सामान्यजनांवर ठसविण्याचे कार्य संतांनी केलेले दिसते. त्यातूनच धर्मभेद, जातिभेद न करण्याची प्रेरणा समाजाला मिळालेली दिसते. आजही महाराष्ट्रात दरवर्षी आषाढीला जी वारी निघते त्यात एकात्मतेचे जे चित्र पाहायला मिळते ते दुर्लक्षून चालणारे नाही. संतांनी वेळोवेळी सांगितलेला सत्कर्माचा, पावित्र्याचा संस्कार समाजाच्या उन्नतीस उपकारक ठरणारा आहे. आजच्या घडीला इस्रायल आणि गाझा पट्टीवर जी युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे ती पाहता आजच्या एकविसाव्या शतकातही आध्यात्माची आवश्यकता विश्वाला असणार आहे यात तिळमात्र शंका असण्याचे कारण नाही. युद्धापेक्षा विश्वाला शांततेची अपरिहार्यता जास्त जाणवते. जोपर्यंत जगात शांतता प्रस्थापित होणार नाही तोवर समाजाचा विकास होऊच शकत नाही. आज सर्वत्र आपणास हिंसाचार, विविध स्वरूपाचे स्कॅम्स, बलात्कार, क्रौर्य दिसत आहे. यामुळे समाजात एकप्रकारची मानसिक अस्वस्थता निर्माण झाली आहे. जगात शांतता प्रस्थापित होण्यासाठी संतसाहित्यातील मूल्यधारा रुजविणे गरजेचे झाले आहे. वैश्विक शांततेसाठी आणि प्रगतीसाठी संत साहित्यासारखा दुसरा तरणोपाय नाही.

**संदर्भ :**

१. डॉ.यू.म.पठाण, मध्ययुगीन संत साहित्य : काही आयाम, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, जून २००३, पृ.१३१

■■■